## महसुल सेवक (कोतवाल) संवर्ग सरळसेवा भरती २०२६
## तालुका पेण, जिल्हा रायगड
## जाहीरनामा

शासन, महसुल व वन विभागाकडील पत्र क्रमांक पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि.१९/०८/२०२६ महसूल सेवकांची रिक्त पदे भरण्यासाठी "एक विशेष बाब" म्हणून भरण्यास मान्यता दिलेली आहे. शासन, महसुल व वन विभागाकडील पत्र क्रमांक पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि.०३/०९/२०२६ व समक्रमांकाचे पत्र दि.०१/१०/२०२६ अन्वये कोतवाल पदभरती २०२६ कार्यक्रम घोषित केलेला आहे, त्यानुसार पेण तालुक्यात महसूल सेवकांची (कोतवाल) रिक्त पदे भरण्याची आहेत.

त्यानुसार **पेण तालुक्यातील** खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय महसुल सेवकांची नेमणुक केली जाणार आहे. तरी ज्या पात्र व्यक्तीस महसुल सेवक (कोतवाल) म्हणून काम करणेची इच्छा आहे, त्यांनी **दि.०२/१०/२०२६ ते दि.१७/१०/२०२६** या कालावधीत **कार्यालयीन वेळेत (सार्वजानिक सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष पोहोच होईल** आशारितीने विहीत नमुन्यामध्ये **तहसील कार्यालय पेण** येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा.

**महसुल सेवक (कोतवाल) पद नियुक्तीसाठी प्रवर्गनिहाय आरक्षणाचा तपशील**

| जातीचा प्रवर्ग | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(क) | वि.मा.प्र. | सा.शै.मा.प्र. | आ.दु.घ. | अरखीव | |
| ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ | १० |

महसूल सेवक पदासाठी आवश्यक पात्रता, अर्ज करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची पध्दती, परिक्षा शुल्क, परीक्षा पध्दती व निकाल इ. सविस्तर तपशील दर्शविणाऱ्या जाहीरनाम्याची प्रत वरील **QR CODE** च्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायती, पंचायत समिती पेण, तहसीलदार पेण, उपविभागीय अधिकारी पेण या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. तरी इच्छुक उमेदवारांना सदर इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरताना सदर जाहिरनाम्याचे अवलोकन करुन, आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील.

**सही/-XXX**
**सदस्य सचिव,**
**महसुल सेवक (कोतवाल)**
**निवड समिती तथा तहसीलदार पेण**

**ठिकाण :- पेण**
**दिनांक :- ०२/१०/२०२६**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय,ता.पेण जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक: ०२१४३-२५२०३६, फॅक्स क्रमांक :०२१४३-२५७८७९
Email id tahasilpen@gmail.com

क्र.आस्था-२/कात-५/ महसूल सेवक(कोतवाल) भरती /२०२६ दिनांक :- ०२/१०/२०२६

प्रति,
मा. राष्ट्रीय सुचना- विज्ञान केंद्र,
जिल्हा- रायगड(अलिबाग).

विषय :- महसूल सेवक (कोतवाल) भरती- २०२६ च्या जाहिरनामा प्रसिद्ध करणे बाबत....

संदर्भ :- १. शासन महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०,दिनांक:-१९ ऑगस्ट ,२०२६.
२. शासन महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०,दिनांक:- ०३ सप्टेंबर, २०२६.
३. शासन महसुल व वन विभागाकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०,दिनांक:- ०१/१०/२०२६
४. मा.जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक/मशा/आस्था-१/अ-८(१)/कोतवाल भरती/२०२६, दि.०१/१०/२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर येते की, पेण तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) भरती-२०२६ चा जाहिरनामा दोन प्रतीत जोडत आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्हाच्या पोर्टल वर पेण तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) भरती- २०२६ बाबतचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात यावा.

आपला विश्वासू,

(तानाजी शेजाळ)
**महसूल सेवक (कोतवाल) भरती**
**समिती सदस्य सचिव**
**तथा तहसिलदार पेण**